**कालमर्यादा**

जा.क्र.स.आ.१०/आस्था/कक्ष-२/समु.बदल्या/१८
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय
दिनांक :- ३ मे, २०१८.

**प्रति**

**विभागीय सहनिबंधक,**
**सहकारी संस्था, प्रशासन/ लेखापरिक्षण सर्व**

**विषय :- समुपदेशनाद्वारे सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था व विशेष लेखापरीक्षक, वर्ग-२ या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदली बाबत.**

संदर्भ :- शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२०१७/प्र.क्र.४१५/ कार्यासन १२ दिनांक ९/०४/२०१८.

उपरोक्त विषयांकडे लक्ष वेधण्यात येत आहे.

सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.९/०४/२०१८ अन्वये समुपदेशाद्वारे बदलीबाबतचे धोरण निश्चित करण्यात आलेले आहे. त्यानुसार दिनांक ३१/०५/२०१८ पर्यंत प्रशासन व लेखापरीक्षण विभागातील वर्ग -२ संवर्गातील प्रत्यक्ष रिक्त पदाची व रिक्त होणाऱ्या संभाव्य पदांची यादी तसेच दिनांक ३१/०५/२०१८ अखेर बदलीस पात्र होणाऱ्या अवघड क्षेत्रातील व बिगर अवघड क्षेत्रातील बदलीपात्र अधिकाऱ्यांची यादी आज दिनांक ३/०५/२०१८ रोजी sahakarayukta.maharashtra.gov.in या वेबसाईटवर तसेच या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

शासन निर्णयात नमूद केलेल्या समुपदेशनाद्वारे बदली धोरणामधील परिशिष्ट १ मधील टप्पा क्र.२ मध्ये नमूद केल्यानुसार आपल्या विभागातील बदलीपात्र अधिकाऱ्यांकडून विवरणपत्र क्र.१ बदली प्राधिकारी कार्यालयास दिनांक ६/०५/२०१८ पर्यंत cooperation.transfer2016@gmail.com या e_mail ID वर सादर होईल असे पहावे. त्यानुषंगाने आपल्या अधिनस्त असणाऱ्या बदलीपात्र अधिकाऱ्यांच्या ही बाब निदर्शनास आणून देऊन विवरणपत्र क्र.१ मधील माहिती या कार्यालयास विहीत मुदतीत सादर होईल याची दक्षता घ्यावी.

मा.सहकार आयुक्त
यांच्या मान्यतेने

(शैलेश कोतमिरे)
अपर निबंधक, सहकारी संस्था (प्रशासन)
महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रत:-**

मा.अपर मुख्य सचिव, सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.